भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.२१६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०३/२०१७

**१) ट्रॅक्टर ट्रॉली चालकाने हयगयीने,निष्काळजीपणे चालवुन झोपडीला धडक मारून अपघात केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २३/०३/२०१७ चे १४.१८ वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रॅक्टर ट्रॉली क्र.एमएच ३६ एल ४९६५ हयगयीने लापरवाहीने रस्त्याने चालवीत आणुन फिर्यादीचे झोपडीला धडक मारून अपघात करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी घनशाम दामाजी पारधी वय ६४ वर्ष रा. आंधळगाव यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.बाभरे पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**२) मिश्रीत माती खाल्याने उपचारा दरम्यान मृत्यु . :—**

दिनांक ०४/०३/२०१७ चे १७.२० वा दरम्यान यातील मृतक ईशिता शामप्रकाश येडेकर वय ०३ वर्ष, रा. उसगांव हिला माती खान्याची सवय होती तीची आई घरी हजर असतांना व मृतक मुलगी ही घरी खेळत असतांनो मिश्रीत माती खावुन प्रकृती बिघडल्याने तीला दिनांक ०४/०३/२०१७ चे १७.०० वा औधपोचाराकरिता डॉक्टर गुप्ता साकोली यांचे कडे नेले असता प्रथमोउपचार करून पुढील उपचार करिता मृतकचे नातेवाईकांनी तीला हेल्थसिटी हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले असतो उपचारा दरम्यान दि. ०९.०३.२०१७ ला मरण पावल्याने पोस्टे. धंताली नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पोस्टे लाखनी येथे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना.बोरकर यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे लाखनी येथे कलम १७४ जाफौ. चा नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. पठाण पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक २४/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ८१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती १२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :—**

दिनांक २४/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. तुमसर येथे अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०१ गुन्हा दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ०५ लिटर हा.भ. दारू किंमती ३००/—रु. असा एकुण किंमती ३००/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोउपनि.ए.व्ही. तुळजेवार
नियंत्रण कक्ष अधिकारी भंडारा
दुरध्वनी.क्र. ७७६८८६९९७७

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.